**ISMT LIMITED**

# पर्यावरण,
# आरोग्य व सुरक्षितता धोरण







## पर्यावरण

पर्यावरण उत्तम राखणे व त्यामध्ये उत्तरोत्तर सुधारणा घडवणे आवश्यक आहे, यावर आय.एस्.एम्.टी. लिमिटेडचा पूर्ण विश्वास आहे. आपल्या सर्व कार्यप्रक्रियांनी त्यांना लागू असलेले कायदे आणि परिमाणांचे अनुसरण करावे, आपल्या कार्यप्रक्रियांचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होऊ देऊ नये आणि शक्य असेल तेथे पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने सकारात्मक योगदान द्यावे, याकरीता कंपनी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

## आरोग्य व सुरक्षितता

कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या तसेच आपल्या औद्योगिक प्रक्रियांचा थेट परिणाम ज्यांच्यावर होतो, अशा व्यक्तींच्या आरोग्य व सुरक्षिततेची काळजी घेण्याच्या दृष्टीने लागू असलेल्या सर्व कायद्यांचे आणि संबंधित औद्योगिक परिमाणे व पद्धतीचे अनुसरण कंपनीकडून केले जाईल. आरोग्य आणि पर्यावरणाची सुरक्षितता हे मुद्दे कंपनीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून हे ध्येय साध्य करण्यासाठी व सदर धोरण कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने योग्य ती सर्व पावले कंपनी व्यवस्थापन उचलेल.

**बी. आर. तनेजा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
**१ जून, २००६**



आय एस एम टी लिमिटेडच्या औद्योगिक धोरणाचा हा संपादित अंश असून कंपनीच्या सर्व शाखांमधील स्टील, ट्यूब आणि ट्युब्युलर कॉम्पोनन्टस्च्या उत्पादन व पुरवठा कार्याला हे धोरण लागू आहे.